ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# गोंड आदिवासी जमाती लोकसाहित्य आणि लोकगीते

**राजेश्वर किसन खुडे**
Research student
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

★★★

**प्रस्तावना** – जगातील सर्वच देशात आदिवासी ही जमात सर्वात जास्त आहे . जंगलात पर्वत रांगात दऱ्याखोऱ्यात राहणारी जमात म्हणून आदिवासींना ओळखले जाते. भारतीय संस्कृतीला प्राचीन आशा स्वरुपाची दीर्घ परंपरा प्राप्त झाली आहे भारतातील प्रचलित समाजव्यवस्था अनेक जाती धर्म यांनी बनवलेली आहे स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदरपासून भारतीय लोकशाहीत्यांच्या अभ्यासाला विल्यम जोन्स थांमस जान आब्रे सर थामस वॉल्टर थामस नाइटले तामस राईट यासारख्या मानवंशशास्त्रज्ञांनी खऱ्या अर्थाने शास्त्रीय स्वरूपाची बैठक प्राप्त करून दिली

गोंडा आदिवासींची लोकगीतांचा मूळ असा कोणी नाही आदिवासी लोकसाहित्य जन्मास आली तीच मूळ जंगलाच्या घनिष्ठ संबंधातून यामुळे लोकगीते जन्मली वाढली ती जंगलातच आदिवासींचा जंगलाशी घनिष्ठ संबंध येतो त्यांच्याइतके जंगलातील वन औषधांचे ज्ञान कुणाजवळही नाही आदिवासी समाजाचे संगीत नृत्य सण–उत्सव यात वेगळेपण दिसून येते ही आदिवासी लोकसाहित्य व लोकगीतातील त्यांची जीवनप्रणाली आहे.

गोड ही दविडाची प्रमुख जात आहे. जंगलात राहणाऱ्या जमातीपैकी एक जमाज म्हणून तिची ओळख आहे गोडांची वस्ती गोदावरी व विंध ्यापर्वत यामध्ये आढळते. सर जॉर्ज ग्रीअसनच्या गोंडी बोली तेलगू पेक्षा तमिळशी व कन्नडसी जास्त मिळतीजुळती वाटते. ही जमात महाराष्ट्रातील चंद्रपूर–गडचिरोली अमरावती मध्ये आढळतील गोंडवनावर मराठ्यांचे राज्य प्रस्थापित होईपर्यंत गोडांचे राज्य होते. गोंडांचा वंशज स्वतः स राजगोड महनवीत असे ते स्वतःस गोंड संस्कृती व भाषेचे खरे प्रतिनिधी समजतात. गोंड या शब्दांचा अर्थ जंगलात राहणारा गोंड लोक स्वतःला कोया किंवा कोयतुर म्हणून घेणे पसंत करतात गो म्हणजे जंगल आणि अड म्हणजे मूळ निर्मितीची जागा होय. गोंडांचा एकंदर 40 जमाती आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात पंधरा आहेत आणि त्याचबरोबर गोंड जमातीचे प्रकार खालील प्रमाणे आहेत. एक राजगोंड दोन धुर्वे तीन खातेला चार माडिया गोंड

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**– १) गोंड आदिवासींच्या साहित्यांचा व लोकगीतांत काही साहित्यिक मूल्य आहेत काय याचा शोध घेणे

२) गोंड आदिवासी लोकसाहित्यातून रसनिष्पत्ती होताना दिसून येते काय ? हे जाणून घेणे

३) आदिवासी गोंड समाजातील भाषिक दृष्टीने अध्ययन करून मांडणी करणे

४) आदिवासी गोंड लोकगीतांचा साहित्यिक प्रभाव आजच्या नव साहित्यावर झाला आहे काय याचा शोध घेणे

५) गोंड आदिवासींच्या सर्वांगीण अभ्यासासाठी लोकगीत महत्त्वाचे माध्यम आहे यांची विश्लेषणात्मक मांडणी करणे

**संशोधन विषयाची गृहीतके** – १) गोंड आदिवासी लोकसाहित्यांच्या लोकगीतांचे साहित्य पोहोचण्यास कमी पडते.२) गोड आदिवासी लोकसाहीत्यांचा व लोकगीतांचा जगासमोर प्रभावीपणे मांडण्यात असक्षम ठरते. ३) गोंड आदिवासीच्या जमातीतील लोकशाहीत्यांचा वेंदना विद्रोह व नकार मांडण्यात आला. ४) आदिवासींच्या जमातीच्या लोकसाहित्यांचे व लोकगीतांचे साहित्य व्यापकप्रमाणात स्वीकारले गेले नाही.

**लोकगीत म्हणजे काय** – लोकवांगमययांचा बराच मोठा भाग लोकगीतामध्ये मोडतो. लोकगीतांचे महत्व विषद करताना ना. रा. शेंडे आपल्या लोकगीतातील काव्य आणि कल्पना वैभव या निबंधात लिहितात. लोकशाहीत्यांची जी अनेक अंगे उपांगे आहेत. त्यात लोकगीत हे विशेष भरदार अंग आहे ते तेजस्वी अंग म्हणजे खेडूतांच्या जीवन संस्कृती रिती रिवाज आदिचे जीवन चित्र उमटविनारा अगदी स्वच्छ आरसाच होय.

लोकगीताला इंग्रजीमध्ये थ्वसोवदह म्हटले जाते. लोकसाहित्य बरोबर लोकगीतांचा ही अभ्यास जागतिक पातळीवर झाला आहे. अनेक विचारवंतांनी आपल्या शब्दात लोकगीतांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अलेक्झांडर क्राप यांचे मत डॉ. शरद व्यवहारे यांनी दिली आहे त्यानुसार लोकगीत हे भावगीत असून लोकगीतांचा उगम निरक्षरात होऊन त्यांचा कता अनामिक असतो. लोकगीतांची निर्मिती भूतकाळातील असून कित्येक शतकांची परंपरा या गीतांना लाभलेली असते. वरील मतानुसार लोकगीत ही प्राचीन काळात निर्माण झालेली व परंपरेने चालत आलेली असून ती अनामित कर्त्यांची भावगीत निर्मिती आहे.

**आदिवासींच्या लोकगीता विषयी माहिती** – रंगीबेरंगी पानाफुलांच्या नेत्रदीपक झुपकयाने मनोहरी नी देखणी सजावट अंगाअंगावर धारण करणाऱ्या महावस्त्रांना रात्रीखुशीने पेललेल्या दऱ्याखोऱ्यातील दुनिया म्हणजे आदिवासींची दुनिया. शहरापासून लांब दूरवर असलेल्या या

दुनियेतील माणस हौस मौजेने ऐस पैस मैदानात येऊन नाचायला व गायाला लागली म्हणजे धरित्रीच्या अंगावर समाधानाचे रोमांच फुलू लागतात. अशावेळी पहाडी मुलुखातील मंद शितल वारा शिळ घालून धावून पुढे येतो. पानाफुलांमधील पार्श्व संगीत उभे करतेकृ मग निजायला धरित्री उशिला धोंडा अनू पांघरायला आभाळ घेत निसर्गाच्या कुशीत वावरताना ही मंडळी एवढी आनंदी कशी ह्यातलं गणित काही दिल्यास सुटतच नाही. आदिवासींची ही दुनिया अदभुताचे पंखलयाली गंधर्व कन्या आहे. ती देखणी तसेच मोहमयीही आहे.

आदिवासींना स्वतःची भावना विचार कल्पना होती. या भावना विचार कल्पना त्यांची आपल्या गीतातून प्रकट केलया आहेत. वाट्याला येणाऱ्या सुख दुःखांच्या वेळ गीतांनी त्यांना सहारा दिला.

**गीतामुळेच त्यांना धैर्य शक्ती मिळत होती.**

**आदिवासी लोककथा,**– आदिवासी काही विशिष्ट जात नावहे तर समाज वैशिष्ट्ये धारण करणाऱ्या अनेक जमातींचा तो एक समूह आहे. भारतातील अनेक जमाती त्यात मोडतात.

इतिहासाचा एक नियम आहे. ज्या समाजाकडे पाशवी तांत्रिक ज्ञान असते तो समाज इतिहास लेखनावर ताबा मिळतो. त्यामुळे इतर समाज घटकांचा इतिहास हळुहळु लोप पावतो.

**आदिवासी लोकगीते** – आदिवासी साहित्याचा विचार करताना तिसरा भारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी जमातींचे सांस्कृतिक भावविश्व आदिवासी लोकगीतांतून प्रकट होते. भौगोलिकदृष्ट्या भारताचा २० टक्के भूभाग आदिवासी क्षेत्राने व्यापलेला आहे. महाराष्ट्राचा विचार करता 47 प्रमुख आदिवासी जमाती महाराष्ट्रात आहेत अनेक उप जमातीही आहेत. यापैकी 74 आदिवासींच्या बोलीभाषा अस्तित्वात आहेत.

**आदिवासी लोकगीतांचे वैशिष्ट्ये** – आदिवासी लोकगीतांची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या लोकगीतात सौंदर्य जाणिवा व प्रेरणा आहेत.ती स्वयंपूर्ण आहेत. डॉक्टर विनायकराव तुमराम यांनी आदिवासी लोकगीतांची ठळक वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे

आदिवासी लोकगीते ही आदिमाचया अस्तित्वा इतकीच प्राचीन असतात. जीवनातील बहुतेक महत्त्वाच्या प्रसंगांना उद्देशून ही लोकगीते असतात. आदिवासी लोकगीते ही गेय स्वरूपाची असून ती त्यांच्या नृत्याच्या वेळी पारंपारिक वाद्यांच्या संगीतावर गायली जातात. नृत्य वाद्यशिवाय आदिवासी लोक ही लोकगीते सहसा गात नसतात. आदिवासी लोकगीतांचा कवी वास्तविक कवी नसून गायक असतो. आदिवासींच्या पथक संस्कृतीचे प्रतिबिंब त्यांच्या लोकगीतात पडलेले आढळून येते.

आदिवासी लोकगीते त्यांच्या समाज जीवनातून आकारास आलेले आहेत. लोकगीते व्यक्ती समाजजीवनावर आधारित आहेत. त्यांच्या लोकगीतांचा महत्त्वाचा विशेष त्यांच्या काव्यात्मक यामध्ये आहे. अशा काव्यातील भावविष्व तर रम्य आणि सौंदर्य संपन्न आहे. ही त्यांच्या बोलीभाशेतून आलेले आहेत. रोजच्या जीवनातील बोल या लोकगीतात आलेले असल्याने लोकगीताने वेगळेपण दिसून येते

**गोंड जमातीचे वर्गीकरण** – भोगोलीक निकशावरील वर्गीकरण दक्षिण भारतात व पश्चिम भारतात गोंड जमात आढळते. दक्षिण भारतात तामिळनाडू केरळ कर्नाटक आंध्र प्रदेश भाषा या निकशावरील वर्गीकरण दविडियन भाषा समूह यात गोंड कोलाम तोडा कोया परधान आहे.

**गोंड जमातीचे सामाजिक जीवन** – गोंड ही जमात गोदावरीच्या तसेच बस्तर आणि सातपुडा पर्वतांच्या रांगात बसलेली आहे. गोंड मुळचे रहिवासी दक्षिण भारतातील असावे असे काही तज्ज्ञांचे मत आहे. साधारण जंगलाच्या पेनगंगा गोदावरी इंद्रावती अशा नद्यांच्या जवळ वस्ती आढळून येते. या लोकांची बोली गोडी आहे.

**गोंड जमातीचे संस्कृती जीवन** – गोंड जमातीत सण– उत्सवाला विशेष महत्व आहे. माडिया भाषेत सणाला पंडूमा म्हणतात. शेतात बी पेरणे नवीन धान्याचे पिक काढणे. नवी फळ काढणे व खाणे इत्यादी. सर्व गोष्टीसाठी गावकरी सामुदायिकरीत्या सन साजरी करतात. त्या दिवशी पोलो म्हणजे सार्वजनिक सुट्टी जाहिर केली जाते. या सणाची पूजा पेरमा किंवा पुजारी करतो पेरमा धार्मिक विधी करतो त्याला वनौपधीचेही ज्ञान असते. पुजारी शकुन आणि अपशकुन सांगतो काळी जादू त्याला येते. दोन जमातीत मृत व्यक्तीला पुरण्याची प्रथा आहे. मूर्तपूर्वजांची पुजा करणे बंधनकारक असते. माडिया गोंड मध्ये दहाव्या दिवशी किंवा केव्हाही करसड हा धार्मिक विधी करण्यात येतो. मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ एक मोठा दगड उभारण्यात येतो त्याला कलबंडा म्हणतात. गोंड जमातींचा आता बाही बाह्य जगासी संपर्क आल्यामुळे त्यांच्या या रूढी–परंपरामध्ये फरक पडत चाललेला दिसून येतो.

**गोंड जमातीचे शैक्षणिक जीवन** – गोंड जमातीची शैक्षणिक विकासात अतिशय कमी प्रमाण येते. प्राथमिक शिक्षण गोंड जमातीत दिल्याषिवाय शिक्षणाची प्रगती होणे कठीण आहे. सन 2011च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण आदिवासी साक्षरता प्रमाण ५२.२ टक्के आहे. गोंड जमातीचे साक्षरता प्रमाण ७ टक्के आहे. पूर्व महाराष्ट्रात आदिवासी कल्याण योजने अंतर्गत शिक्षित गोंडांना नोकर्यार दिल्या गेल्या. आदिवासी केंद्रे व राज्यसरकार यांनी अनेक योजना राबविले आहेत. ६ ते १४ वर्षे या वयोगटातील आदिवासी विद्यार्थ्यांना पर्याय शिक्षण मोफत देण्यात यावे व विद्यार्थ्यांना अनौपचारिक शिक्षण व प्रौढ शिक्षण मिळावे यासाठी 100 लोकसंख्या असलेल्या परिसरात प्राथमिक शाळा उघडणे यासारखे व अंशकालीन वर्ग व पाळणाघरे ही शासनाने सुरु केली आहेत.

**समारोप** – आदिवासी समाज शिक्षणाचा आधार घेऊन नोकरी

व्यवसायाकडे ते मार्गक्रमण करू लागला आहे. तसेच राजकीय धार्मिक सामाजिक क्षेत्रांचे महत्व त्यांना पटायला लागले आहे. पण ज्यू व निग्रो लोकांच्या तुलनेत भारतीय आदिवासी खूप खूप मागे आहेत. त्यांनी आजूनही पूर्णपणे आपला विकास व्हावा या दृष्टीने पाऊले उचललेली नाही. त्यांना ब्राह्मणाच्या वर्चस्वाखाली येणे कधीच पसंत नाही. आदिवासी संस्कृतींची जडणघडण व विकास आदिवासी समाजाने मोठ्या कौषल्याने केला आहे. आदिवासी समाज एका छताखाली आणण्यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न होत असली तरी त्याला पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही. जागतिक पातळीवर आदिवासींची एक विचार प्रणालीची प्रक्रिया सुरू झाली तरी तिला देश सीमांचे बंधन आहेत. आदिवासीसाठी शासनाने व वैधानिक संरक्षण दिले.

## संदर्भ ग्रंथ

*१) डॉ, तुकाराम षेगटे आदिवासी साहित्य नियतकालिकातील डिंपल पब्लिकेषन नवघर वसई जि. ठाणे पहिली आवृत्ती ५ डिसेंबर पान नंबर १०६*

*२) डॉ,ऊशा किरण आक्रोष आत्राम आदिवासी वीर पुरुश . प्रकाशन अहेरी संमेलन आदिवासी भारत १९९४ विशांक यवतमाळ पान नंबर 06*

*३) डॉ, सौ. शैलजा देवगावकर .आदिवासी विश्व .आनंद प्रकाशन नागपूर .आवृत्ती पहिली जुलै २००१ पान नंबर १६१.*

*४) सुनील शिंदे .आदिवासींचे शिक्षण आणि दुर्गम आदिवासी अकोले तालुका प्रकाषन सुगावा पुणे . आवृत्ती पहिली डिसेंबर १९९९ पान नंबर ७०.*

*५) डॉ, रामशेट्टी शेटकार. प्रा. बालाजी शिंदे. लोकसाहित्य काल आज आणि उद्या. अरुण प्रकाशन लातूर*